साप्रवि/शि.नि./दवसु/अनुसूची-ग/सुधारणा

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत, तळ मजला,
प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.

**महावितरण**

## प्रशासकीय परिपत्रक क्रमांक : ५४ दिनांक ८/६/२००६

विषय : दवसु संचालनालयातंर्गत कार्यरत असलेल्या फिरत्या पथकातील कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंग कारवाई कोणी करावी या विषयीचे मार्गदर्शन.

---

प्रशासकीय परिपत्रक क्र.३९ दि. २१/४/२००६ अन्वये दक्षता व सुरक्षा संचालनालयातंर्गत कार्यरत असलेल्या फिरत्या पथकातील दवसु संवर्गातील कर्मचा-यांव्यतिरिक्त इतर संवर्गातील कर्मचा-यांनी फिरत्या पथकात कार्यरत असतांना गैरकृत्य केले असल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंग कारवाई करण्यासाठी सक्षम अधिकारी, प्रथम अपील प्राधिकारी व द्वितीय अपील प्राधिकारी विहित करण्यात आले आहेत. त्यामध्ये फिरत्या पथकातील वेतनगट - १ मधील कर्मचा-यांसाठी (दवसु संवर्गाव्यतिरिक्त) व फिरत्या पथकाला संलग्न (attached to flying squad) असलेले वेतनगट - २ मधील कर्मचा-यांसाठी (दवसु संवर्गाव्यतिरिक्त) अनुक्रमे प्रथम अपील प्राधिकारी व द्वितीय अपील प्राधिकारी म्हणून संचालक(मानव संसाधन) यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

तथापि, कंपनीने संचालक(मानव संसाधन) हे पद अद्याप भरलेले नाही. त्यामुळे संचालक(मानव संसाधन) यांना प्रथम अपील प्राधिकारी अथवा द्वितीय अपील प्राधिकारी म्हणून सादर करावयाची प्रकरणे प्रलंबित असल्याने संचालक(मानव संसाधन) यांना दिलेले अधिकार कोणत्या अधिका-यास द्यावेत ही बाब विचाराधीन होती. या बाबीचा सर्वकष अभ्यास करुन आता व्यवस्थापकीय संचालक(म.रा.वि.वितरण कंपनी मर्या.) यांनी संचालक(संचलन) व संचालक(वित्त) यांच्याशी विचारविनियम करुन खालील प्रमाणे सुधारित अधिकार प्रदान करण्यास मंजुरी दिली आहे.

| अनुसूच ग मध्ये अंतर्भाव करावयाचा अनुक्रमांक | कर्मचा-याचा प्रवर्ग | सक्षम अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | द्वितीय अपील प्राधिकारी (प्रथम अपील प्राधिका-याने दुस-या अपिलास परवानगी दिल्यास) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २ (चार) (अ) | फिरत्या पथकातील वेतनगट -१ मधील कर्मचारी (दवसु संवर्गाव्यतिरिक्त) | संचालक(दवसु) | संचालक(संचलन) | व्यवस्थापकीय संचालक |
| ३ (तीन) (अ) | फिरत्या पथकाला संलग्न (attached to Flying Squad) असलेले वेतनगट -२ मधील कर्मचारी (दवसु संवर्गाव्यतिरिक्त) | संबंधित परिक्षेत्राचे उप संचालक(द,सुवअं) | संचालक(दवसु) | संचालक(संचलन) |
| ४ (चार) (अ) | फिरत्या पथकाला संलग्न (attached to Flying Squad) असलेले वेतनगट -३ मधील कर्मचारी (दवसु संवर्गाव्यतिरिक्त) | फिरत्या पथकाचा प्रमुख अधिकारी (वेतनगट १ पेक्षा कमी दर्जाचा नसावा) | संबंधित परिक्षेत्राचे उप संचालक(द,सुवअं) | संचालक(दवसु) |

मुख्य महाव्यवस्थापक(कव)

प्रति,
प्रेषण यादीप्रमाणे विभागीय कार्यालयाच्या स्तरापर्यंत.

A:\Circular(M).doc